# राशिभविष्य - डिसेंबर, २०२१.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशिभविष्याच्या अखेरीस त्या-त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेल्या त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अस्थिर, चंचल, संतापी, लहरी, कोणाचा धाक वा दडपण सहन न होणारा असा घडला असण्याची शक्यता वाटते. पण तो शास्त्रीय सांशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे अपमान सहन करावे लागतील. त्यामुळे चिडून मनात सूडभावना प्रज्वलित होईल. या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचे आजार त्रस्त करतील. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत रवि,मंगळ , बुध आणि केतू असे चार ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहेत. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे इच्छा-आकांक्षा अपूर्ण राहतील. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. अनारोग्य होईल. पण बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व कार्यसिद्धी होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येतील. कार्यदिरंगाई होईल व भांडणे होतील. मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. हाडमोड होईल, व नैराश्य येईल. केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. कुटुंबात कलह होतील, त्याच्यामुळे रक्तविकार, त्वचारोग, मुखदन्त रोग अशापैकी आजार होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अपघात भयही आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि व वक्री शुक्र असे दोन ग्रह असून येथील शनि लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना लाभदायक होईल.

पण दशम स्थान शुक्रास प्रतिकुल असल्यामुळे या स्थानी असलेल्या वक्री शुक्रामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु अनुकुल होईल पण नेपच्यून प्रतिकुल होईल. गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. अनेक मार्गांनी धनलाभ होईल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. पण नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, आर्थिक लाभात विलंब, कुमार्गी मित्रांपासून नुकसान होईल व त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत अपमान स करावे लागतील. त्यामुळे संताप येऊन मनात सूडभावना प्रज्वलित होईल. त्याशिवाय काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत रवि, मंगळ, बुध आणि केतु असे चार ग्रह असून येथील बुध दिनांक ९ पासून तर रवि महिन्याच्या उत्तरार्धाच्या संपूर्ण काळात या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहेत. त्यामुळे हे चारही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात केंद्रस्थानी असल्याने अनुकुल होईल ; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे प्रतिकुल होईल व या राशीच्या अष्टम स्थानी राहणाऱ्या रवि - मंगळामुळे अनारोग्य होणे संभवते. उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. तसेच पतिपत्नीमधील वाद, गैरसमज, जीवनसाथी/संगिनीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. त्याशिवाय ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांच्या भागीदारीत वाद, भांडणे, गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी बाधा येणेही संभवते. केतूमुळे मनस्थिती अस्थिर राहील. बुधामुळे अनुकुल घटना घडतील व काही प्रमाणात दिलासा मिळेल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत वक्री शुक्रही आहे. येथील शनीमुळे या राशीच्या काही

मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. अशुभ असे फारसे काही घडणार नाही. शुक्रामुळे काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही संभवते. इतरांना ऐषाराम व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे अध्यात्मास अनुकुल असणारे ग्रह आहेत. गुरुमुळे बौद्धिक, शेक्षणिक तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अपेक्षित प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. काही मंडळींना अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेचे कौतुक करतील. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थाचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींच्या जीवनात अकारण शत्रुत्व निर्माण होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः “ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोम सोमाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काही घडेल याची खात्री देता येणार नाही. सर्व काही अनिश्चित असेच घडेल. मित्रांशी वाद, भांडणे होतील. पण अर्थलाभ होऊ शकेल. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील, पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत रवि, मंगळ , बुध व केतू असे चार ग्रह असून येथील रवि आणि बुध हे दोन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत जात आहेत. बुध ग्रह महिन्याचा अधिक काळ या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत असल्याने प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, दुःखदायक घटना घडणे संभवते. रवि-मंगळ अनारोग्यकारक होतील व त्यांच्यामुळे उष्णताविकाराचे

आजार होणे सभवते. पण रवि ग्रह दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. केतू अनुकुल होईल, व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल. आचारविचार उच्च होतील, काही मंडळींना प्रसिद्धी मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत शुक्रही आहे. शनि ग्रह प्रतिकुल व अनारोग्यकारक होईल. पण शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होऊ शकेल. . या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून ते अध्यात्माची मनापासून आवड असणारांना अनुकुल होतील व उपासनेद्वारे मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. गुरुमुळे प्रवासयोग संभवतो. गुण प्रदर्शित करण्यासाठी संधी मिळेल. नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल; तर काहींना सूचक स्वप्ने पडतील. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काही घडण्याची शक्यताच दिसत नाही. उलट मित्रांशी भांडणे होण्याचीच शक्यता आहे. हितशत्रूंपासून त्रास होईल. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे अर्थलाभ होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत रवि, मंगळ, बुध आणि केतु असे चार ग्रह असून हे चारही ग्रह महिन्याच्या बहुतांश काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात संततीसंबंधी समस्या, मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे मनाविरुद्ध आचरण, शैक्षणिक प्रगतीत येणारे अडथळे, अडचणी, स्वतः:चे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपैकी काहींचा होणारा दुरावा व त्यामुळे येणारी मानसिक अस्वस्थता, राहत्या जागेसंबंधी समस्या अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -स्थानी बुध या

राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होतील. रवि ग्रह दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. बुधामुळे हाती घेतलेले कार्य सिद्धीस जाईल व काही मंडळींना धनलाभ तर काहींना प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत शुक्रही आहे. शुक्र विवाहयोगास अनुकुल असला तरी शनिमुळे विवाहयोग जुळून येण्यात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. पण अन्य प्रकारे शनि प्रतिकुल होणार नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून पाण्यापासून धोकादायक तसेच विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. गुरु- मुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना अनुकुल होणार असला तरी तो वक्री असल्याने अडचणी, अडथळे सहन करतच प्रगती करावी लागेल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच नोकरीत हाती अधिकार असणारांपैकी काही मंडळींना वाम मार्ग धन प्राप्त करण्याचा मोह अस्वस्थ करील. परंतु त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत रवि-मंगळ-बुध-केतु असे चार राहू असून हे चारही ग्रह या राशीच्या मंडळींना प्रतिकुल होणार असून रवि अनारोग्यकारक होईल, मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होतील, असमाधानकारक घटना घडतील, बुधामुळे

आर्थिक नुकसान, धननाश होणे संभवते. पण येथील बुधामुळे मित्रसुख मिळू शकेल. केतूमुळे कोणाशी पटणार नाही, अकारण चिंता त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि -बुध या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत गेल्यावरसुद्धा प्रतिकुलच होतील व या राशीच्या नोकरदार मंडळींना रविमुळे अनारोग्य, अपघात भय, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कुटुंबातील प्रिय जनांपासून होणारे दूरत्व, संततीचे आजार, बुधामुळे मुलांपैकी कोणाच्या गैर आचरणामुळे होणारा मनस्ताप, अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत शुक्रही आहे. येथील शनि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल,पण त्याच्यामुळे अनारोग्य, गैरसमजुतीमुळे वाद, भांडणे होतील व त्यातून अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. शुक्रामुळे कलाक्षेत्रात उच्च गुणवत्ता असूनही कलावंतांना आपल्या कलेतील प्रगती प्रगट करण्यास संधीच मिळणार नाही. शिवाय येथील शुक्रामध्ये शुद्ध प्रेमभावना नसल्यामुळे फसगत होऊन नैराश्य येणे संभवते. काही मंडळी व्यसनाधीन होण्याचीही शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु प्रेमसंबंध, स्नेहसंबंध निर्माण होण्यास अनुकुल असला तरी सोबत असलेल्या नेपच्यूनमुळे अशा संबंधात तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. शिवाय त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काहींना बढती, काही मंडळींना अधिकारपद किंवा एखादे सत्तास्थान मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीविष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यातर मनापासून श्रद्धेने “श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध -केतु असे चार ग्रह असून रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत जात आहेत. केतूमुळे मानसिक

दु:ख त्रस्त करील. मंगळ महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य, हिंमत वाढेल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; तर महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल व गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. पण धननाश, आर्थिक नुकसान होणे संभवते. येथील बुधामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अकारण शत्रुत्व होणे, हितशत्रूंपासून त्रास होणे संभवते. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होणार असल्याने या राशीच्या नोकरदार मंडळींनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत गेल्यावर त्याच्यामुळे नियोजित कार्यात दिरंगाई होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, कौटुंबिक समस्या त्रस्त करणे, अनारोग्याचा त्रास सहन करावा लागणे व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत शुक्रही आहे. येथील स्वराशीतील शनि चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल, चिकाटीचा गुण देईल; पण त्याच्यामुळे मन व बुद्धी संशयी, स्वार्थी होणे संभवते. येथील शुक्र कोणत्याही कलेची मनापासून आवड असणारांना त्या कलेत प्रगती होण्यास अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे शारीरिक आरोग्य सुधारेल, पण नेपच्यूनमुळे उगीचच एखादी आजार भावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, अस्वस्थ होईल, काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे प्रवास योग येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नम::” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी :” ओम त्वष्टे नम::” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध -केतू असे चार ग्रह असून हे चारही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असले तरी बुध आणि रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत गेल्यावर अनुकुल, धनदायक व आरोग्यदायक

होतील आणि या राशीच्या शासकीय नोकरीत असलेल्या मंडळींना बढती, अधिकार पद, क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळू शकेल. पण महिन्याच्या संपूर्ण काळात मंगळ - बुध -केतू प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत शुक्रही आहे. या राशीच्या ज्या मंडळींकडे शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होतील. ऐषाराम लाभेल, विवाहेच्छूना विवाहयोग येईल; पण शनीमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असून नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत .भावनाशील होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. तसेच तो गूढ संशोधनाची आवड असणारांना संशोधनकार्यात यशदायक होईल. गुरु ग्रह सर्व प्रकारे सुखकारक होईल व त्याच्यामुळे प्रेमसंबंधात वाढ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल व काही मंडळींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमंताची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी रवि -मंगळ-बुध -केतू असे चार ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी धनु राशीत जात आहेत. त्यामुळे रवि -मंगळ - बुध हे तीन ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून रविमुळे अनारोग्य, मनस्ताप; शरीरपीडा, दगदग, श्रम, आर्थिक चिंताभय, यांमुळे थकवा येईल. मंगळामुळे स्वभाव हट्टी, संतापी, मानापमान फार असणारा असा घडेल . बुधामुळे मित्रद्रोह, धननाश, चंचल चित्त, कुसंगती यांचा त्रास

होणे संभवते. पण केतू अनुकुल होईल व त्याच्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत शुक्रही आहे. स्वराशीतील शनीमुळे या राशीच्या काही मंडळींना उत्तम नोकरी मिळू शकेल. काही मंडळींना त्यांचे आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. शुक्रामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींना भूमिलाभ होईल; तर काहींना अर्थलाभ, प्रतिष्ठा प्राप्त होईल. क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार मनासारखे घडून येतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत नेपच्यूनमुळे घरगुती गोष्टींसंबंधी गैरसमज, घोटाळे निर्माण होतील व कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना मुदतीच्या तापाचा आजार होणे संभवते. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनी सतत खोल विचारात दंग असू नये. नपेक्षा डोकेदुखीचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना मेंदूविकाराचा आजार होणेही शक्य दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना कपटी विचार त्रस्त करतील. काही मंडळींना वाममार्ग धन प्राप्त करून घेण्याचा मोह अस्वस्थ करील. त्याशिवाय या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनात विविध कारणांनी बाधा येणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. .म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी " ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध -केतू असे चार ग्रह असून हे चारही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात या राशीच्या मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल.केतूमुळे स्वभाव चंचल, लहरी होईल. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी गेल्यावरही प्रतिकुलच होतील. रविमुळे शरीरपीडा, अनारोग्य, मनस्ताप, मानभंग, चिंता यांमुळे गलितगात्र थकवा येईल. मंगळ व बुध हे हाडवैरी ग्रह पूर्णपणे अशुभ असून त्यांच्यामुळे वाद, भांडणे होणे, अनारोग्य, मानहानी होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक चिंता त्रस्त करतील. तसेच या राशीच्या काही मंडळींना कुमार्गी मित्रांमुळे कुसंगतीची बाधा झाल्यास धननाश होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्यासोबत शुक्रही आहे. येथील शनीमुळे या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक संकटे अस्वस्थ करतील. जपा. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरूमुळे काही मंडळींना प्रवासाचे योग येतील, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती कोमल व भावनाशील होईल. हा नेपच्यून आध्यात्मिक प्रगतीस व गूढ संशोधनात्मक कार्यास उपयुक्त व यशदायक होईल. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो उच्च, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे अन्य जाति -धर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध असणारांना आर्थिक लाभ होतील. पण स्वभाव कावेबाज, कपटी होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मनःशान्ति लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे व “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ ओम उदकाय

नमः”  तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा  आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:”  तारक मंत्राचा १०८ वेळा  जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी  याच स्वराशीत  शनि असून सोबत शुक्रही आहे. येथील शनिमुळे  अनारोग्य होणे, , नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, कुटुंबातील  प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण होणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे नैराश्य येईल. पण काही मंडळींना प्रवासयोग येणेही संभवते. पण सोबत शुक्र असल्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल व उत्तम अर्थलाभ होईल.

पण सोबत नेपच्यून असल्यामुळे घडणाऱ्या अनुकूल व शुभ घटनांमध्ये तो बाधा निर्माण करण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, अस्थिर, विक्षिप्त होईल व त्यामुळे कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध - केतू असे चार ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहेत. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होतील. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ मिळवावा लागेल. पण त्याच्यामुळे काही मडळींना एखादी मौल्यवान वस्तू प्राप्त होण्याची शक्यता आहे. येथील केतू अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा,

ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल व लाभदायक होईल. त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. पण गुरुसोबत असलेल्या नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल होईल, मानसिक संवेदना अति जलद होतील, मन उदास होईल व त्यातून नैराश्य येणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना बौद्धिकशक्ती, आकलनशक्ती व स्मरणशक्ती प्राप्त होईल व त्यांना आपल्या नियोजित संशोधन कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखशांतीत बाधा निर्माण होईल. जपा. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध व केतू असे चार ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जात आहेत. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक व व्यावसायिक जीवनात सतत मनोनुकुल घटना घडतील. पण मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण येथील केतू सूचित करतो की त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरी किंवा व्यवसायच मनापासून करावा. तसेच या दशम स्थानी असलेल्या मंगळामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत शुक्रही आहे. येथील शनि सतत अनारोग्यकारक व मनस्तापदायक होण्याची शक्यता आहे. पण सोबत शुक्र असल्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना

मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मन व बुद्धी अस्थिर, चंचल होईल व अविचाराने नको ते आचरण घडेल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्या माणसाचा अपमान होत आहे हेही समजणार नाही. तसेच अविचाराने नको इतका खर्च कराल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनस्थिती हरहुन्नरी, उदार राहील, हातून कर्तृत्व घडेल, पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत रवि -मंगळ -बुध व केतू असे चार ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम या व्यवसायस्थानी जात आहेत. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होतील. महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे कसले तरी भय अस्वस्थ करील. मानसिक ताण सहन करावा लागेल. वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. त्यामुळे अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात या रविमुळे नोकरी-व्यवसायात अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. काही मंडळींना बढती, काहींना अधिकारपद मिळेल व आर्थिक, सामाजिक दर्जा प्राप्त होईल. महिन्याच्या पूर्वार्धात भाग्यस्थानी असलेल्या बुधामुळे सतत वाद, भांडणे, नियोजित कार्यात दिरंगाई, अडचणी, अडथळे निर्माण होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, धनवृद्धी होईल. भाग्यस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. केतूमुळे धूर्त, ढोंगी आचरण होईल. तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत शुक्रही आहे. येथील शनि सर्वसाधारणपणे अनुकुल होईल. अर्थवाढ होईल. पण संततीपैकी कोणास कसला तरी असह्य त्रास होण्याची शक्यता आहे. पण शुक्र अनुकुल असल्याने सतत मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून अध्यात्म,समाजसेवा अशा कार्यास अनुकुल होतील. येथील नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना विशेष अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीशिवशंकराची

उपासना  अनुकुल होईल व मनःशांती  लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी  गुरुचरित्रा”चेः आणि “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना  मनापासून श्रद्धेने  ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा  आणि ज्यांचे  जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ ओम  पूषाय नमः:” तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooooooooo=====